"मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती संताजी घोरपडेंची कामगिरी"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविद्या शाखेअंतर्गत 'इतिहास' या विषयामध्ये पिएच.डी. (विद्यावाचस्पती)

पदवीसाठी सादर केलेला

पूर्व संशोधन आराखडा

संशोधक विद्यार्थी

बुद्रूक साईनाथ बळीराम

एम.ए.इतिहास,बि.एड्.,

डि.टी.एड्.

संशोधन पर्यवेक्षक

डॉ. बोकारे तूकाराम एकनाथवराव

इतिहास विभाग प्रमुख,

श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव.जि. नांदेड.-431712

2021

"मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती संताजी घोरपडेंची कामगिरी"

प्रस्तावना :

भारत हा प्राचीन काळपासुन 'सोने की चिड़ीया' म्हणुन ओळखला जातो. त्यामूळे भारतावर अनेक परकिय सत्तांनी आकमणे केली, या आक्रमणास भारतीयांनी प्रतिकारही केला. भारतात इ.स.नाच्या 7 व्या शतकात महमंद-बीन-कासीम याने आक्रमण केले आणि इथुनच भारतावर परकिय मुस्लिम आक्रमणास सुरुवात झाली. महमंद घोरीच्या आक्रमणावेळी कुतूबूद्दीन ऐबकाने दिल्लीवर ताबा मिळवला आणि सुलतानशाहीची स्थापना केली. परंतु दक्षीण भारत या परकीय मुस्लीम आक्रमणांपासुन सुरक्षित राहीला. पुढे अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेवर स्वारी करुन अनेक प्रांत जिंकले आणि दक्षीण भारतात मुस्लीम अंमल निर्माण केला. दक्षिणेत बहमनी साम्राज्याची शकले पडुन पाच शाह्या निर्माण झाल्या. यामधील निजामशाही, आदिलशाही मध्ये अनेक मराठा घराणी लष्करी चाकरीत होती.

महाराष्ट्र ही संतांची आणि पराक्रमी विरांची भूमी म्हणून ओळखली जाते. संतानी आपल्या विचारांनी, शिकवणूकीने महाराष्ट्रातील गुलामगीरीच्या अंधारात निपचत पडलेल्या समाजात नवचेतना निर्माण केली तर विर पुरुषांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर यवनी आक्रमणाने नष्ट होवू पाहणाऱ्या समाजाच्या अस्मीतेचे रक्षण केले.

शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य संभाजी महाराजांनी समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलले. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत खुद्द बाहदशहा औरंगजेब दक्षिणेत आला. 'संगमेश्वर' या ठिकाणी शेख निजामाने छापा टाकून संभाजी राजे आणि कवी कलशांना पकडले. यावेळी झालेल्या लढाईत म्हाळोजी घोरपडे कामी आले. संभाजी राजेच्या हत्येनंतर मराठ्यांचे राज्य नष्ट होते की काय ? अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतू याचवेळी शिवाजी महाराजांच्या आणि शंभू राजेंच्या तालमीत तयार झालेले वीर पुढे सरसावले. या योध्यातील एक आघाडीचा वीर म्हणजे सेनापती संताजी घोरपडे होय. संताजी घोरपडेंनी छत्रपती राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली मोगलांना प्रखरतेने विरोध केला आणि स्वराज्याचे यवनी शत्रूंपासुन संरक्षण केले हे प्रस्तूत संशोधनाच्या माध्यमातुन पाहणार आहोत.

1. विषय निवडीचा उद्देश :

मराठ्यांच्या इतिहासातील अनेक पराक्रमी विरांचा, सरदारांचा इतिहास ज्ञात झाला आहे, परंतु अजुनही काही कर्तबगार वीरांच्या इतिहासावर प्रकाश टाकला गेला नाही, त्यापैकी संताजी घोरपडे हे एक वीर आहेत. संताजी घोरपडे कुशल सेनानी, गनिमी काव्यात निपूण होते. त्यांनी अनेक बड्या सरदारांचा दारुण पराभव केला. त्यांच्या चरित्राच्या माध्यमातून प्रेरणा मिळते, म्हणून "मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती संताजी घोरपडेंची कामगिरी" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

2. संशोधनाची आवश्यकता :

छत्रपती संभाजी राजेंच्या हत्येनंतर स्वराज्यात अराजकता निर्माण झाली होती. या परिस्थितीत राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली संताजी घोरपडेंनी महत्वाची कामगिरी केली. स्वराज्याप्रती निष्ठा राखत अनेक शत्रुंचा पराभव केला. गनिमी कावा पध्दतीने मोठमोठ्या शत्रुंना धुळ चारली. संताजी घोरपडेंच्यापराक्रमाचे वर्णन शत्रुपक्षाच्या इतिहासकारांनी देखील केले आहे. येणाऱ्या भावी पिढीस संताजी घोरपडेंच्या चरित्रातून प्रेरणा मिळेल, ध्येय गाठण्याची जिद्द मिळेल यासाठी या संशोधनाची आवश्यकता आहे.

3. संशोधनाची गृहितके :

1. संताजी घोरपडेंच्या पुर्वचरित्राविषयी माहीती मिळते.
2. घोरपडे घराणे हे क्षत्रीय घराणे आहे.
3. संताजी घोरपडेंनी स्वराज्यासाठी मोठी कामगिरी केली आहे.
4. संताजी घोरपडेंच्या व्यक्तीमत्वात स्वराज्य निष्ठा, स्वराज्य प्रेमाचे संस्कार दिसतात.
5. संताजी घोरपडेंनी गनिमी कावा तंत्राने अनेक शत्रुंचा पराभव केला.
6. संताजी घोरपडेंनी व धनाजी जाधवांनी स्वराज्य राखण्यात मोलाचे कार्य केले.

4. संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. संताजी घोरपडेंच्या पुर्वचरित्राचा शोध घेणे.
2. घोरपडे घराण्याच्या क्षात्रपरंपरेचा शोध घेणे.

3. संताजी घोरपडेंच्या कामगिरीचा शोध घेणे.

4. संताजी घोरपडेंच्या व्यक्तीमत्वाच्या विविध पैलूंचा शोध घेणे.

5. संताजी घोरपडेंच्या गनिमी कावा तंत्राचा शोध घेणे.

6. संताजी घोरपडे व धनाजी जाधवांच्या कामगिरीचा शोध घेणे.

5. संशोधन पध्दती :

प्रस्तूत शोधकार्यासाठी संदर्भ पध्दती व व्यष्टी अध्ययन पध्दतीतील व्यक्ती व्यष्टी अध्ययन पध्दतीचा वापर केला जाईल. तसेच प्राथमिक साधनांचा उपयोग केला जाणार आहे. या प्राथमिक संदर्भ साधनांमध्ये मुधोळ संस्थानाच्या घोरपडे घराण्याचा इतिहास, मोगल-मराठा संघर्ष (लुत्फुल्लाखानाची पत्रे), खाफीखानाचे मुन्तखउल लुबाब इत्यादी ग्रंथांचा वापर केला जाणार आहे. तसेच दुय्यम संदर्भ साधनांमध्ये रियासतकार सरदेसाई यांच्या संदर्भग्रंथांचा उपयोग करुन या संशोधन विषयाची मांडणी केली जाणार आहे.

[प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी पुढील संभावित प्रकरणात केली जाणार आहे.]

प्रकरण पहिले

घोरपडे घराण्याचा इतिहास

'भोसले आणि घोरपडे' घराणे हे या एकाच वृक्षाच्या दोन शाखा आहेत. मुळ पुरुष सुजनसिंह हा उदयपुरच्या राजघराण्यातील होता. दक्षिणेत आल्यावर यांनी हसनगंगूची सत्ता मजबुत करण्यासाठी मेहनत घेतली. याच सुजनसिंहचा पणतु भैरवसिंह यास मुधोळची 84 गावाची जहागरी प्राप्त झाली. भैरवसिंहास 'भुशलधारी' असे संबोधले आहे. 'भुशलधारी' म्हणजेच 'भुतलावरील शस्त्रधारी', 'क्षत्रीय योध्दा' होय.

महंमद गवानने कोकणची मोहीम हाती घेतली होती. त्याला भैरवसिंहाचा नातू आणि कर्णसिंहाचा पुत्र भीमसिंह यांनी मोलाची साथ दिली. या पितापुत्रांनी 'खेळणा किल्ला' घोरपडीच्या साह्याने सर केला, यात कर्णसिंह मारला गेला. बहामणी सुलतानाने कर्णसिंहास "राजा घोरपडे बहाद्दर" हा किताब आणि घोरपडीच्या रंगाचे निशान दिले.

प्रस्तुत प्रकरणात घोरपडे घराण्याचा इतिहासाविषयी शोध घेतला जाणार आहे.

प्रकरण दुसरे

संताजी घोरपडेंचा उदय

संताजी घोरपडेंचा शिवाजी महाराजांच्या जालना स्वारीत सहभाग होता. संताजींनी कर्नाटकातील पठाण, बेरड बंडखोरांचा पाडाव केला. सेनापती हंबीरराव मोहितेनी शिवाजी राजांकडे संताजीस 'जुमलेदार' करावे अशी शिफारस केली. संताजी घोरपडेंनी संगमेश्वरात शेख निजामास प्रखरतेने विरोध केला. प्रस्तुत प्रकरणात संताजी घोरपडेंनी 'सेनापती पद' मिळण्यापुर्वी त्यांनी केलेली कामगीरी अभ्यासली जाणार आहे.

प्रकरण तिसरे

छत्रपती राजाराम कालीन सेनापती संताजी घोरपडेंची कामगिरी

छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येनंतर मराठे पेटुन उठले. राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली धनाजी जाधव आणि संताजी घोरपडेंनी औरंगजेबाच्या बलाढ्य सेनेचा दिर्घकाळ सामना केला. संताजी घोरपडेंचे नाव ऐकताच मुघल सेनानींच्या उरात धडकी भरत असे. "ज्याला ज्याला म्हणुन संताजीशी मुकाबला करण्याचा आणि लढण्याचा प्रसंग आला एक तर तो मारला जाई किंवा जखमी होवुन संताजीच्या कैदेत सापडे किंवा त्याचा पराजय होवून त्याचे सैन्य गारद होई." प्रस्तुत प्रकरणात सर्जाखान, लुत्फुल्लाखान, जाननिसार खान, अलिमर्दाखान इ. अनेक मोगल सरदारांचा संताजी घोरपडेंनी पराभव केला याची चिकित्सा करणार आहोत.

प्रकरण चौथे

संताजी घोरपडे आणि धनाजी जाधवांच्या संयुक्त मोहिमा

संताजी-धनाजींनी आपल्या पराक्रमाने मोगल सैन्यात एवढी दहशत बसवली होती की, अष्टोप्रहर मोगल सैन्यात व छावणीत भितीचे वातावरण असे, ही मोगल सैन्याची स्थिती तर मोगल लष्करातील प्राण्यांची परिस्थिती यापेक्षा वेगळी नव्हती.

'मोगलांचे घोडे पाणी पित नसत तेंव्हा त्या मुक्या प्राण्यास म्हणत, "तुला पाण्यात संताजी धनाजी दिसतात की काय ?" यावरुन या जोडीच्या पराक्रमाची कल्पना सहज येते.

या प्रकरणात उमराणी युध्द (1673), मोगल प्रदेशात लूट (1674), सावनूर युध्द (1677), कर्नाटक मोहीम (1677), संभाजी महाराजांच्या काळातील मोहीमा, बेळगाव, धारवाड भागातील मोहीमा, नरगुंद-गोविंदगड परिसरातील मोहीमा, ईस्माइलमखा व अलीमर्दाखान कैद(1692), जिंजीतील मोगलांवर हल्ले इ. अनेक मोहीमाविषयी प्रस्तुत प्रकरणात संशोधन करणार आहोत.

प्रकरण पाचवे

संताजी घोरपडे व छत्रपती राजाराम महाराज संबंध

छत्रपती राजाराम महाराजांनी संताजी घोरपडे यांना 'सेनापती' पद बहाल केले. छत्रपती राजाराम महाराजांचा विश्वास पराक्रमाच्या जोरावर संताजी घोरपडेंनी सार्थ ठरवला. स्वराजाच्या कार्यासाठी अनेक मोहिमांत सहभाग घेतला, परंतू जिंजीत राजाराम महाराजांशी संताजी घोरपडेंचा बिघाड झाला. छत्रपती राजाराम महाराजांनी संताजी घोरपडेंच्या बंदोबस्तासाठी धनाजी जाधव, अमृतराव निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली संताजी घोरपडेंवर कांचीपुरम जवळील आयरकूटी येथे◌े उभय पक्षात लढाई झाली. संताजीने त्यांचा पराभव केला धनाजी जाधव पळून गेले. अमृतराव निंबाळकरास हत्तीच्या पायी दिले तर छत्रपती राजाराम महाराजांना संताजी घोरपडेंनी कैद केले. परंतू छत्रपती राजराम महाराजांची संताजी घोरपडेंनी बिनशर्त सुटका केली व माफी मागीतली. प्रस्तुत प्रकरणात छत्रपती राजाराम महाराज व सेनापती संताजी घोरपडे यांच्या संबंधाविषयी माहीती घेणार आहोत.

प्रकरण सहावे

उपसंहार व निष्कर्ष

'उपसंहार व निष्कर्ष' हे प्रबंधातील सहावे आणि शेवटचे प्रकरण आहे. या प्रकरणात संशोधनातील संदर्भ साहित्याच्या माध्यमातून उपसंहार व निष्कर्षाची मांडणी केली जाणार आहे.

संदर्भग्रंथसुची :

1. Duff G.J., *History of Marathas,* IInd edi-1995[Reprint], DK Publication Pvt., 01, Ansari Road, Dariyaganj, New Delhi-110002.

2. Bilmoria J.N., (Ed)- *Letters Aurangzib,* D.B., Taraporwala son and Company, 210 Hornby Road, Fort, Bombay [Sitamau Collection]

3. Sharma S.B., (Ed) *Akhbarat-I-Darbar-I-Maullh,* Vol.I-F.edi-1935.

4. Sarkar J.N., *Shivaji and His Times,* Forth edi-Feb. 1948, Orient Longman Ltd.,B-7/7,Asafali, Road, New Delhi-01.

5. Nandkarni R.V.,The *Rise and Fall of the Maratha Empire,F.Edi-1966,* Popular Prakashan, 35C, Tardeo Road, Mumbai-34.

6. पगडी एस.एम.,अहकामे *आलमगिरी (औरंगजेबाची आज्ञापत्रे),प्र.आ.सप्टेंबर-1993,* परचुरे प्रकाशन मंदिर,203/4 मेहता भवन, गिरगाव, मुंबई-04.

7. पुरंदरे कृ.वा., (सं.),शिवचरित्र *साहित्य,* खंड-1, प्र.आ.1926,चिटणीस, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

8. सरदेसाई गो.स.,(सं.), *ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी,* प्र.आ.,15 मार्च-1997, मुंबई गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई.

9. पगडी एस.एम., *मराठ्यांचे स्वातंत्र्युध्द,* प्र.आ.-1962, जोशी ॲण्ड लोखंडे प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-02.

10. खरे ग.ह., *दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने,* खंड-02,प्र.आ.-1934, चिटणीस, भारत इतिहास संशोधन मंडळ सदशिव पेठ पुणे.

11. डफ ग्रँट, *मराठ्यांची बखर,* आ.सहावी-1916, निर्णयसागर छापखाना, मुंबई.

12. सं. राजवाडे वि.का., *मराठ्यांच्या इतिहासाची साधने,* खंड-01 ते 22.

13. कमल गोखले, *शिवपुत्र संभाजी,* ति.आ.-30 सप्टेंबर-1981 नवकमल प्रकाशन, 1393,शुक्रवार पेठ, बाजीराव रस्ता, पुणे-411030.

14. पवार जयसिंगराव, (सं.) *सेनापती संताजी घोरपडे,* प्र.आ.मार्च 1987, मंजुश्री प्रकाशन, कोल्हापुर-11.

15. बेंद्रे वा.सी., *राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन मराठ्यांचा मोगलाशी लढा,* प्र.आ-01 नोव्हेंबर-1975, लोकवाङ्मयगृह,190B खेतवाडी, मेनरोड, मुंबई-04.

16. दिवेकर स.म., (सं.), *कवी परमानंद कृत श्री शिवभारत,* प्र.आ.शके 1849,(इ.स.1927) एस.म.दिवेकर, गणेशखिंड, मुंबई-02.

17. हणवते उत्तम (डॉ.), *मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती धनाजी जाधवांची कामगीरी,* अप्रकाशीत शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,मार्च-2000.

18. घोरपडे बा.बा.राजे, *घोरपडे घराण्याचा इतिहास,* प्र.आ.मार्च-1989, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मुंबई-400032.

19. जोशी द.पं., जोशी उषा, *समग्र सेतू माधवराव पगडी,* खंड-2 रा, प्रका.डॉ. विद्या देवधर, कार्यवाह,मराठी साहित्य परिषद, (आं.प्र.), इसामीयॉ बाजार,हैद्राबाद-500027

20. *अप्रकाशित कागदपत्रे-पुणे* दप्तर.

21. *मोगल-मराठा संघर्ष* (लुत्फुलाखानाची कागदपत्रे)

22. मोगल दरबारची कागदपत्रे.

23. पगडी एस.एम., *हिंदवी स्वराज्य आणि मोगल,* मा.इ.स.मंडळ, पुणे संग्रह.

24. गर्गे स.मा./वर्टिकर श.ह., कापसीकर, *सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,* प्र.आ.-14 नोव्हेंबर-1974,स.म.गर्गे, ज्ञानेश,1205/4,शिवाजीनगर,पुणे-04.

25. गुळवणी मु.गो. ,हुकुमतपनाह, प्र.आ.-11 एप्रिल 1994, हुकुमतपनाह रामचंद्रपंत अमात्य, विश्वस्त निधी,25 ख.,राजप्रसाद ई,ताराबाई पार्क,कोल्हापुर.

संशोधक विद्यार्थी | **संशोधन पर्यवेक्षक**

बुद्रुक साईनाथ बळीराम
एम.ए.इतिहास, बि.एड्.
डि.टी.एड्.
Email. sainath7858@gmail.com
मो.नं. 7709107858

डॉ. बोकारे तूकाराम एकनाथराव
इतिहास विभाग प्रमुख,
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, हदगाव, जि.नांदेड -431712
Email-tukarambokare58@gmail.com
Mob.No.7350333214